संचार

सोलापूर, शुक्रवार, दि. १४ मे २०१०

# पद्मजा फेणाणींच्या गायनाची रसिकांना मेजवानी

सोलापूर, दि. १३ (प्रतिनिधी)- अक्कलकोटमधील 'शिवपुरी'चे संस्थापक श्री गजानन महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त रविवार दि. १६ मे रोजी हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील ख्यातनाम गायिका पद्मश्री पद्मजा फेणाणी-जोगळेकर यांच्या भक्तीगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

'शिवपुरी'तील प्रांगणात रात्री नऊ वाजता हा गायन सोहळा होईल. पद्मजा फेणाणी यांचे बऱ्याच वर्षानंतर सोलापूर जिल्ह्यात आगमन होत असून त्यांचा सुश्राव्य 'गळा' ऐकण्याचे भाग्य सोलापूरकरांना लाभणार आहे. पद्मजा यांनी स्वत:हून या ठिकाणी सेवा करण्याची इच्छा व्यक्त केली असून त्यांच्यासमवेत सहकलावंत वाद्यवृंदही येणार आहे, अशी माहिती 'शिवपुरी'चे व्यवस्थापक विद्याधर पारखे, जितेंद्रकुमार जाजू यांनी गुरुवारी येथे पत्रकार परिषदेत दिली.

श्री गजानन महाराज यांचा जन्मकाळ बारा वाजून बेचाळीस मिनिटाचा आहे. त्यामुळे रविवारी रात्री नऊ



पासून विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून त्याचा श्रीगणेशा पद्मजाजींच्या गायनाने होईल. महाराजांचे परदेशातील कांही अनुयायी येणार आहेत. तसेच सोलापूर व इतर भागातून येणाऱ्या रसिकांची सोय करण्यात आली आहे, असेही त्यांनी सांगितले.

१७ मे हा स्वामी समर्थ महाराजांनी स्थापन केलेल्या दिव्य गुरुपीठावरील ४ थे महापुरुष सत्यधर्मप्रणेता वैश्वानरअवतार परमसद्गुरू श्री गजानन महाराज यांचा जन्मदिवस आहे. यंदाची हा जन्मोत्सव यावर्षीही शिवपुरी अक्कलकोट येथे विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. हा जन्मोत्सव म्हणजे परमसद्गुरू श्री गजानन महाराज यांचे देश विदेशातील अनुयायांचे व भक्तांचे संमेलनच असते.

हे सर्व अनुयायी व भक्तगण येथे येऊन विविध कार्यक्रमामध्ये सहभागी होत असतात. यात प्रामुख्याने श्रमसेवा, वैदिक जीवनपध्दतीची शिकवण, अग्निहोत्र प्रचार प्रसार वृत्तांत, ध्यान, योग व रात्री श्री जन्मवेळेपर्यंत संगीत, भक्तीगीते, आराधना अशा कार्यक्रमांचा आनंदोत्सवच असतो, असेही त्यांनी सांगितले. यावेळी दादा शिरसीकर, राजेश पाटील उपस्थित होते.